नि.फौ.ख.क्र. ७७/२०१८
(नि. २६ )
CNR No.: MHSI05-000459-2018

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव— अमोल अशोक कुंभार,
वय सुमारे २९ वर्षे, व्यवसाय — सहा.अभियंता, महा.जिवन प्राधिकरण
निवासस्थान— सावंतवाडी, ता. सावंतवाडी, जिल्हा — सिंधुदूर्ग.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती व्हि. डी. प्रभु.**

१. २०१७ मध्ये मी सावंतवाडी उपविभाग येथे सहा अभियंता म्हणुन कार्यरत होतो. दिनांक २/०४/२०१७ रोजी मी माझे कार्यालयात उपस्थित होतो, तेव्हा आमचे वरिष्ठ दामोदरे यांनी आम्हाला सुचना केल्या की तुम्हाला पंचनाम्यासाठी आरवली येथे उपस्थित रहायचे आहे. त्याप्रमाणे मी, राजेंद्र घाटगे आणि आमचे शिपाई अनिल राणे असे सर्व मिळून आरवली येथे गेलो. आम्हाला राजेंद्र घाटगे यांनी घटनास्थळ दाखविले. त्याठिकाणी अर्धवट तोडलले पे ॲण्ड युज टॉयलेट होते. त्याचे पश्चिमेकडील आणि उत्तरेकडील भाग पूर्णपणे काढून टाकलेला होता. त्याठिकाणी कौले आणि फॅब्रीकेशनचे दरवाजे, पाईप, व २००० लि.ची टाकी ठेवली होती. पोलीसांनी माझे समक्ष पंचनामा तयार केला तो मी वाचून पाहिला. त्याच्यावर माझे सहया घेण्यात आल्या. (साक्षीदाराला घटनास्थळाचा पंचनामा दाखविण्यात आला) हा पंचनामा पोलीसानी माझ्या समक्ष तयार केला होता. त्यातील मजकुर हा खरा व बरोबर आहे. त्याच्यामध्ये माझे दोन ठिकाणी सहया होत्या. **(घटनास्थळाच्या पंचनामास नि. क्रं. २७ देण्यात आले).** पंचनामा सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत चालू होता.

**उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री. भणगे एस्. एन्. यांचेतर्फे**

२. हे म्हणणे खरे आहे की या कामातील फिर्यादी हेमंत विष्णु दामोदरे हे माझे वरिष्ठ अधिकारी आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी जे पाडलेले टॉयलेट पाहिले ते न वापरातले होते. हे म्हणणे खरे आहे की मी पाहिलेले टॉयलेट बंद स्थितीमध्ये होते. संडासची टाकी फुटलेल्या अवस्थेमध्ये पाठीमागे होती. हे म्हणणे खरे आहे की त्या टॉयलेटच्या बाजुने वाट जात होती. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळी बांधण्यात

आलेल्या मुता—या या बंद स्थितीत होत्या. हे म्हणणे खरे आहे की संडासची टाकी ही उघडी होती व तिचा कचराकुंडीसारखा वापर केला होता. हे म्हणणे खरे आहे की त्याठिकाणावरुन ५ फुटावरती देवस्थानाची भिंत होती. ज्या जमिनीमध्ये पंचनामा केला ती जमिन कोणाच्या मालकीची आहे याची मला माहिती नाही. संडासची टाकी कोणाच्या जमिनीमध्ये बसविली होती याची मला माहिती नाही. या प्रकरणातील नेमका वाद काय आहे याची मला माहिती नाही. मला याबाबत काही माहिती नाही की आमच्या विभागाने कोणाचीही परवानगी न घेता टॉयलटचे बांधकाम केले होते व त्याचे उद्‌घाटनाची वाट पाहत होते. हे म्हणणे खरे आहे की या कामातील फिर्यादी दुसरे पंच, मी आणि घाटगे साहेब असे सर्व एका खात्यातील आहोत. हे म्हणणे खरे नाही की त्यांच्यासाठी मी पंचनाम्यावर न वाचता सहया केल्या. हे म्हणणे खरे नही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/—

**दिनांक :— २३/०७/२०१९.** **न्यायदंडाधिकारी वर्ग १ वेंगुर्ला.**